**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ७०/२०१९** | **दिनांक ३०/०८/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २४/०८/२०१९ ते ३०/०८/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ३१/०८/२०१९ सकाळी ८:३० पासून ०४/०९/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४/०८ | २५/०८ | २६/०८ | २७/०८ | २८/०८ | २९/०८ | ३०/०८ | | ३१/०८ | ०१/०९ | ०२/०९ | ०३/०९ | ०४/०९ |
| १.० | ०.० | - | ९.० | ७.० | १.० | - | **पाऊस (मिमी)** | २५ | १७ | १५ | २४ | २३ |
| ३२.५ | ३१.० | - | ३१.४ | ३३.४ | ३२.५ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३३ | ३२ | ३२ | ३२ | ३२ |
| २४.७ | २५.२ | - | २४.८ | २५.० | २४.७ | - | **किमान तापमान (अं.से)** | २६ | २५ | २६ | २५ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ६ | ८ | ७ | ७ | ८ |
| - | ९९ | - | १०० | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९२ | ९३ | ९३ | ९३ | ९२ |
| ८९ | ९३ | ८४- | ९७ | ८७ | ८९ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७३ | ८१ | ७३ | ८१ | ८१ |
| २ | ४ | - | ४ | २ | २ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १० | १० | १४ | ८ | ११ |
| नै.प. | वा.प. | नै. प. | नै. द. | वा.प. | नै.प. | - | **वाऱ्याची दिशा** | द. | द. | द. | द. | द. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ३१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०१९ पर्यंत मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश ढगाळ राहील.**

**दिनांक ३० ऑगस्ट ते ०५ सप्टेंबर २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **विशेष सल्ला** | - | • पुरामुळे भातशेतीचे पूर्ण नुकसान झाले असल्यास सर्वप्रथम जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्यासाठी जास्त खोल भागामध्ये निचरा चर (१ ते १.५ फूट रुंद आणि २ ते २.५ फूट खोल) उताराच्या दिशेने काढून पाण्याचा निचरा करावा यामुळे जमीन वाफसा स्थितीत लवकर येण्यास मदत होईल. जमीन वाफसा स्थितीत आल्यानंतर कमी कालावधीची कडधान्ये पिके (चवळी, कुळीथ, मूग, वाल), कारळा ही पिके किंवा कमी कालावधीची भाजीपाला पिके (कोथिंबीर, पालक, माठ, मेथी) उर्वरीत कालावधीसाठी लागवड करावी. जेणेकरून भात पिकाचे झालेले नुकसान काही प्रमाणात भरून काढता येईल. |
| **भात** | **फुटवे अवस्था** | • भात पिक फुटवे अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी.पर्यंत नियंत्रित करावी.<br>• भात पिक पुर्नलागवडीनंतर एक महिन्याने गरजेनुसार बेणणी आणि खुरपणी करून भात पिकास फुटवे येण्याच्या अवस्थेत नत्र खताचा दुसरा हप्ता हेक्टरी ८७ किलो युरिया या प्रमाणात देण्यात यावा.<br>• पाऊसाची उघडीप आणि २७ ते २८ अं.सें. दरम्यान राहणारे सरासरी तापमानामुळे भात पिकावर खोड किडीचा आणि पाने गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून आल्यास किडीच्या नियंत्रणासाठी कारट्याप हायड्रोक्लोराईड ४ जी कीटकनाशक २१.८ कि.ग्रॅ. प्रती हेक्टरी या प्रमाणात जमिनीत पुरेशी ओल असताना देण्यात यावे. पुरेशा ओलाव्य अभावी दाणेदार कीटकनाशक वापरणे शक्य नसल्यास क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २६ मि.ली. किंवा कारट्याप हायड्रोक्लोराईड ५० टक्के २० ग्रॅम किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५ मि.ली यापैकी कोणत्याही कीटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पहिली फवारणी करावी. गरज पडल्यास ८ ते १० दिवसांनी दुसरी फवारणी करावी. |
| **आंबा** | **पालवी** | • वाढत्या तापमानामुळे आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण तयार होत असून पालवीचे किडी आणि रोगांपासून पासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. + बाविस्टीन २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **भाजीपाला पिके** | **फलधारणा** | • ढगाळ वातावरण व आर्द्रतेमुळे वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये केवडा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने काढून नष्ट करावीत व मॅन्कोझेब किंवा झायनेब २.५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.<br>• वांगी, मिरची, कारली, पडवळ, दुधीभोपळा, दोडका भाजीपाला पिकावर पाने खाणारी अळी, पांढरी माशी, तुडतुडे, मावा इ. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मेलाथिओन २० मिली किंवा डायमिथोएट १५ मिली प्रति १० लि. पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये फळमाशीच्या नियंत्रणासाठी 'मिथाईल युजेनोल' किंवा 'क्यु-लुअर' रक्षक सापळे भाजीपाला क्षेत्रामध्ये जमिनीपासून १ ते २ फूट उंचीवर प्रति हेक्टरी ४ लावावेत. |

• **टीप:** फवारणी ३ ते ४ तासांची पाऊसाची उघडीप असताना करावी.

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**